महाराष्ट्र ग्रामीण बँक
(भारत सरकार द्वारा स्थापित शेड्युल्ड बँक)
पुरस्कृत बँकः बँक ऑफ महाराष्ट्र
मुख्य कार्यालयः 'जीवनश्री', प्लॉट नं. ३५, सेक्टर जी,
टाऊन सेन्टर, सिडको, औरंगाबाद - ४३१ ००३

MAHARASHTRA GRAMIN BANK
(A Scheduled Bank established by Government of India)
Sponsor Bank: Bank of Maharashtra
H.O. : 'Jeevanshree', Plot No.35, Sector G
Town Centre, CIDCO, AURANGABAD - 431 003

(0240) 2476139, 2476140 FAX: (0240)2476143
e mail: mgbhonnd@gmail.com Visit: www.mahagramin.in

# नवीन कार भाड्याने घेण्यासाठी निविदा सुचना

महाराष्ट्र ग्रामीण बँक ही भारत सरकार द्वारा स्थापित देशातील अग्रगण्य ग्रामीण बँक असुन, बँकेला त्यांचे बीड, लातूर,नांदेड, आणि परभणी येथील क्षेत्रीय व्यवस्थापकांच्या कार्यालयीन वापरासाठी डिझेल वर चालणारी प्रत्येकी एक नवीन tata टियागो (Tiago) किंवा मारुती सुझुकी स्विफ्ट (फक्त बेसिक मॉडेल) यापैकी एक, व्यावसायिक परवाना ( पिवळी नंबर प्लेट) असलेली गाडी मासिक भाडेतत्वावर तीन वर्षांच्या करारावर घेणे आहे. त्यासाठी इच्छुक पात्र कार मालकांकडून सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

निविदा भरण्यासाठीच्या अटी व शर्ती, निविदा नमुना तसेच इतर माहिती उपरोक्त क्षेत्रीय कार्यालये किंवा बँकेच्या www.mahagramin.in ह्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. निविदा दि. २९.०१.२०१८ (दुपारी ३.०० वाजेपर्यंत) त्या त्या सम्बन्धित क्षेत्रीय कार्यालयांस दाखल करता येतील.

कोऱ्या निविदा संबंधित क्षेत्रिय कार्यालयांमध्ये रु.५००/- रोखीने अथवा कोणत्याही सरकारी बँकेचा रु. ५००/- चा महाराष्ट्र ग्रामीण बँक या नावाने देय्य असलेला धनाकर्ष जमा करून प्राप्त करता येईल. कोऱ्या निविदा संबंधित क्षेत्रिय कार्यालयांमधुन दि. २०.०१.२०१८ (दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध असतील. पूर्णपणे भरलेल्या निविदा उपरोक्त मुदतीच्या आंत सम्बन्धित क्षेत्रीय कार्यालयांस दाखल करता येतील. त्यानंतर आलेल्या निविदा कोणत्याही परिस्थितीमध्ये स्वीकारल्या जाणार नाहीत.

कोणतीही अथवा सर्वच निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा तसेच याबाबत सर्व अधिकार बँकेने स्वतःकडे राखुन ठेवले आहेत.

इच्छुक व्यक्ती अथवा, फर्म्स किंवा एजन्सीजनी सर्व अटी व शर्तींचा अभ्यास करूनच पात्र असल्यास आपल्या निविदा दाखल कराव्यात.

Sd/-

**मुख्य सरव्यवस्थापक**

**दि.:** १३.०१.२०१८

**स्थळ:** औरंगाबाद

# निविदा भरण्यासाठीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१) एका पाकिटात कार संबंधित माहिती व रु. ५००/- चा धनाकर्ष (डी.डी.) आणि दुसऱ्या पाकिटात अपेक्षित मासिक भाडे निविदा असे टाकुन हि दोनही सीलबंद पाकिटे एका स्वतंत्र पाकिटात बंद करून निविदा दाखल कराव्यात, सर्व माहिती एकाच पाकिटात दिल्यास सदरील निविदा लगेच रद्द करण्यात येईल व त्या निविदेचा विचार केला जाणार नाही.
कार डिझेल वर चालणारीच असावी. भाडेतत्वावर देऊ केलेली कार नवीन (म्हणजेच मागील एक वर्षाच्या आत खरेदी केलेली तसेच २५००० कि.मी.च्या आत चाललेली) असावी.

२) कार निविदा भरणाऱ्या व्यक्तीच्या, फर्म अथवा एजन्सीच्या नावे असावी. तसेच सदरील कारचा चालू वर्षासाठीचा विमा घेतलेला असावा.

३) कारचा चालक कार मालकांनाच द्यावा लागेल. चालक कुशल तसेच कोणत्याही प्रकारचे व्यसन नसलेला असावा आणि त्याला कमीत कमी ५ वर्षे वाहन चालविण्याचा अनुभव असावा.

४) कारचा देखभाल खर्च व चालकाचा वेतानासाहित सर्व खर्च कार मालकांना करावा लागेल.

५) कारसाठी दरमहा लागणारा इंधन खर्च बँक स्वतः करेल.

६) कार संपुर्णपणे क्षेत्रीय व्यवस्थापकांच्या ताब्यात राहील, रविवार अथवा सुटीच्या दिवशी देखील कार मालकांना वापरता येणार नाही व कार सुट्टीच्या कालावधीमध्ये क्षेत्रीय व्यवस्थापकांकडेच ठेवावी लागेल.

७) निविदा भरतांना देखभाल खर्च, चालकांचे वेतन ई. बाबींचा विचार आणि कार तीन वर्षांसाठी किरायाने द्यायची असून अपेक्षित मासिक भाडे रक्कम टाकावी.

८) कार देखभालीसाठी कार मालकांकडे देण्यात येईल तेव्हा एक दिवसापेक्षा जास्त कालावधी दुरुस्ती/देखभालीसाठी लागत असल्यास क्षेत्रीय व्यवस्थापकांसाठी पर्यायी कार उपलब्ध करून द्यावी लागेल.

९) कार भाड्याने देत असताना कमीत कमी ३ वर्षांच्या कालावधीसाठी लिखीत करार करून द्यावा लागेल. एकदा ठरलेले मासिक भाडे कराराचा कालावधी पूर्ण होईपर्यंत लागू राहील. मध्येच भाडेवाढ देता येणार नाही.

१०) दुर्दैवाने अपघात वगैरे झाल्यास चालकाच्या जीविताची तसेच कारच्या नुकसानीची जबाबदारी बँकेकडे किंवा क्षेत्रीय व्यवस्थापकांकडे राहणार नाही, त्याची संपूर्ण जबाबदारी कार मालक अथवा चालकाकडेच असेल.

११) कारमध्ये प्रवास करणाऱ्या बँकेच्या अधिकाऱ्यांचे रक्षणासाठी चालक संपुर्णपणे व्यसन रहित व जबाबदारी पूर्वक वागणारा तसेच संयमी, सुसंस्कृत, व मितभाषी असावा. चालक बँकेच्या अधिकाऱ्यांसोबत गैरवर्तन करणारा आढळल्यास त्याला त्वरित कार वरून काढून टाकण्याची आणि पर्यायी योग्य तो चालक त्वरित उपलब्ध करून देण्याची जबाबदारी कार मालकाची असेल.

१२) कारचे ठरलेले मासिक भाडे कार मालकाच्या बँक खात्यामध्ये दरमहा जमा करून अदा करण्यात येईल. त्यासाठी, निवड झालेल्या कार मालकास स्वतःच्या बँक खात्याची माहिती संबंधित क्षेत्रिय कार्यालयास द्यावी लागेल.

१३) पात्र असल्यास कारच्या मासिक भाडे रक्कमेतून शासकीय नियमाप्रमाणे उत्पन्न कार (Income Tax) कपात करण्यात येऊन तो शासनाकडे वर्ग करण्यात येईल.

१४) भाड्याने देऊ केलेली कार बँकेच्या/वित्तीय संस्थेच्या अर्थ सहाय्याद्वारे घेतली असल्यास संबंधित कर्जखाते नियमित असणे अनिवार्य आहे.

१५) कारचे इन्सुरंस (विमा) व इतर कागदपत्रे वेळेतच नूतनीकरणाची जबाबदारी कार मालकाची असेल.

१६) कार बँकेकडे भाड्याने दिल्यानंतर कार/कारमालक यांचे विषयी काही तक्रार असल्यास त्याची तसेच पोलीस खात्याची काही कार्यवाही झाल्यास त्याची सर्व जबाबदारी कार मालकाकडे राहील.

१७) कार बँकेच्या वापरात असताना कार किंवा चालक यांच्याकडुन बँकेस कोणत्याही प्रकारची तोशीस सहन करावी लागणार नाही याची संपूर्ण जबाबदारी कार मालकावर राहील.

१८) कार दुरुस्ती किंवा इतर कारणानिमित्त कार मालकाकडे राहात असल्यास पर्यायी कार देण्याची व त्या वाहनासाठी इंधना व्यतिरिक्त सर्व खर्च कार मालकास करावा लागेल, त्यासाठी बँक जबाबदार राहणार नाही.

१९) निविदा भरतांना भाड्याने देऊ केलेल्या कारचे कागदपत्रे जसे आर सी बुक, इन्सुरंस प्वालीसी, चालकाच्या गाडी चालविण्याच्या परवान्याची (Driving License) नुतनीकरण झालेली प्रत इत्यादी तसेच कार मालकाचे आधार कार्ड,/गाडी चालविण्याचा परवाना/मतदान कार्ड/पासपोर्ट यापैकी एक तसेच लाईट बिल यांची छायाप्रत जोडणे अनिवार्य आहे.

२०) दि. २९.०१.२०१८ पर्यंत आलेल्या सर्व निविदा त्या त्या क्षेत्रिय कार्यालयांद्वारे संबंधित कमिटी द्वारे उघडण्यात येतील. सदरील निविदांची चाळणी करून व इतर आवश्यक पात्रता लक्षात घेऊन तसेच कमीत कमी मासिक भाडे दर्शविलेल्या निविदेच्या कार मालकाशीच पुढील कार्यवाहीबाबत पात्र व्यवहार केला जाईल.

इतर सर्व निविदा रद्द समजण्यात येतील तसेच याबाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार केला जाणार नाही.

आवश्यकता भासल्यास एक किंवा सर्वच निविदा कोणत्याही क्षणी कुठल्याही स्तरावर कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार बँकेने स्वतःकडे राखुन ठेवले आहेत.

निवड झालेल्या कार मालकासोबत करार केल्यानंतरही बँकेला आवश्यकता भासल्यास केलेला करार कोणत्याही वेळी रद्द करण्याचा अधिकार बँकेला राहील. तथापि याबाबत कार मालकास ८ दिवसापूर्वी आगाऊ सूचना देण्यात येईल.

Bakade

मुख्य सरव्यवस्थापक

**निविदा दाखल करण्यासाठी संबंधित क्षेत्रिय कार्यालयांचे पत्ते:**

| | |
|---|---|
| क्षेत्रिय व्यवस्थापक<br>महाराष्ट्र ग्रामीण बँक,<br>क्षेत्रिय कार्यालय: बीड<br>सुभाष रोड, बीड<br>जिल्हा: बीड<br>फोन न. ०२४४२: २२८९३८, २२१७७८ | क्षेत्रिय व्यवस्थापक<br>महाराष्ट्र ग्रामीण बँक,<br>क्षेत्रिय कार्यालय: लातुर<br>शिवाजी चौक, संभाजी कॉम्प्लेक्स,<br>लातुर, जिल्हा: लातुर<br>फोन न.०२३८२: २५६७०८ |
| क्षेत्रिय व्यवस्थापक<br>महाराष्ट्र ग्रामीण बँक,<br>क्षेत्रिय कार्यालय: नांदेड<br>डॉ. केसराले बिल्डींग, यशवंतनगर,<br>नांदेड, जिल्हा: नांदेड<br>फोन न.०२४६२: २५०६९५ | क्षेत्रिय व्यवस्थापक<br>महाराष्ट्र ग्रामीण बँक,<br>क्षेत्रिय कार्यालय: परभणी<br>"संतगुरुकृपा",, शिवाजीनगर, परभणी,<br>जिल्हा: परभणी<br>फोन न. ०२४५२: २३२०४२, २३२०४४ |

# निविदा फॉर्म A

दिनांक:_ _ _ _ _

महाराष्ट्र ग्रामीण बँक क्षेत्रिय कार्यालय:_ _ _ _ _ यांना मासिक भाडे तत्वावर द्यावयाच्या **कार मालकाची माहिती**

| | | |
|---|---|---|
| ०१ | कार मालकाचे संपूर्ण नाव | |
| ०२ | संपूर्ण पत्ता | - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -<br>- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - |
| ०३ | कारचा आर टी ओ नोंदणी क्र. (गाडी नं.) | |
| ०४ | दूरध्वनी /मोबाईल क्र. | |
| ०५ | आधार/मतदान पासपोर्ट कार्ड ई. | नंबर: |
| ०६ | कार स्वतःच्या नावे आहे काय? | होय / नाही |
| ०७ | वाहन भाड्याने देण्याचा व्यवसाय आहे काय? असल्यास किती वर्षा पासून | होय / नाही |
| ०८ | कार मालकांकडे असलेल्या वाहनांची संख्या (वाहन भाड्याने देण्याचा व्यवसाय असल्यास दुकाने अधिनियम प्रमाणपत्र प्रत जोडावी) | |
| ०९ | कार दुरुस्तीसाठी एक दिवसापेक्षा जास्त कालावधी लागल्यास पर्यायी व्यवस्था कशी करणार? | |
| १० | भाड्याने देऊ केलेल्या कारवर बँक/इतर वित्तीय संस्थां यांचे कर्ज आहे काय? | |
| | असल्यास- बँकेचे नाव:<br>कर्जाची मूळ रक्कम<br>३१.१२.२०१७ रोजी कर्जबाकी रक्कम | |
| | कर्जखाते नियमित आहे काय? | होय / नाही |
| | नियमित  नसल्यास कारण | |

मी खालील हस्ताक्षर कर्ता लिहून देतो की, मी दिलेली उपरोक्त माहिती पूर्णता खरी असुन दिलेली माहिती खोटी निघाल्यास मी त्यासाठी सर्वस्वी जबाबदार राहील व याबाबत बँक माझ्यावर कायदेशीर कार्यवाही करेल याची मला कल्पना आहे. तसेच याबाबत बँकेला काहीही तोशीस लागू देणार नाही याची मी याद्वारे हमी देत आहे.

आपला विश्वासू

सही

कार मालकाचे नाव: _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

# निविदा फॉर्म B

दिनांक:_ _ _ _ _

महाराष्ट्र ग्रामीण बँक क्षेत्रिय कार्यालय:_ _ _ _यांना मासिक भाडे तत्वावर द्यावयाच्या **कार बद्दल माहिती:**

| | | |
|---|---|---|
| ०१ | कार मालकाचे संपूर्ण नाव | |
| ०२ | संपूर्ण पत्ता | - - - - - - - - - - - - - - - - - -<br>- - - - - - - - - - - - - - - - - -<br>- - - - - - - - - - - - - - - - - - |
| ०३ | कारचा आर टी ओ नोंदणी क्र. (गाडी नं.) | |
| ०४ | कारचे उत्पादन वर्ष | |
| ०५ | कार विकत घेतल्याचा दिनांक | |
| ०६ | कार तयार करणाऱ्या कंपनीचे नाव व कारचे मॉडेल | |
| ०७ | आवश्यक इंधनाचा प्रकार | _ _ _ _ _ _ _ (डिझेल वाहनास प्राधान्य) |
| | प्रती लिटर कापले जाणारे अंतर | _ _ _ _कि.मी. |
| | भाड्याने द्यावयाचे वेळी चाललेले अंतर | _ _ _ _ _ _ _ कि.मी. |
| | वहन क्षमता | १+ _ _ |
| ०८ | अपेक्षित मासिक भाडे | रु. _ _ _ _ _ _ (अक्षरी:_ _ _ _ _ _ _ |
| ०९ | कारवर नेमणूक करणार असणाऱ्या चालकाचे नाव | |
| | चालकाचा संपूर्ण पत्ता | |
| | जन्म तारीख | |
| | शिक्षण | |
| | वाहन चालविण्याचा अधिकृत परवाना आहे काय? | होय / नाही (छायाप्रत अनिवार्य) |
| | परवाना नुतनीकरण केल्याचा दिनांक | |
| | परवाना वैध असेपर्यंतचा अंतिम दिनांक | |
| १० | चालक कार चालविण्यास सक्षम असल्याबाबतचे आणि वर्तणूक चांगली असल्याचे प्रतिज्ञापत्र सोबत जोडावे | |
| ११ | कारचा नियमित चालक गैरहजर असल्यास त्याचे जागी दुसरा चालक देण्याची तयारी/क्षमता आहे काय?: होय / नाही | |
| १२ | कार मालकाचे बँकेत खाते आहे काय? | होय / नाही |

आपला विश्वासू

सही

कार मालकाचे नाव: _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _